लोकमत

# सार्वजनिक क्षेत्रात प्रामाणिक माणसांची गरज

## शिवराम भोजे : गडहिंग्लजमध्ये 'रवळनाथ', 'झेप'तर्फे गौरव समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** बहुतेक सर्वच क्षेत्रांत भ्रष्टाचार बोकाळला आहे. कोणत्याही सरकारी कार्यालयात जनतेची कामे वेळेवर होत नसल्याचा अनुभव पदोपदी येत आहे. त्यामुळे वेळेचा आणि पैशांचा अपव्यय होत असून जनतेचे पर्यायाने देशाचे मोठे नुकसान होत आहे. हे राष्ट्रीय नुकसान टाळण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात प्रामाणिक माणसांनीच गरज आहे, असे परखड मत ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांनी व्यक्त केले.

येथील श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी व झेप ॲकॅडमीतर्फे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

सांगलीच्या शांतिनिकेतन विद्यापीठातर्फे कर्मयोगी पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. भोजे यांचा चौगले यांच्याहस्ते शाल, ग्रंथ व गुलाबपुष्प देऊन सत्कार झाला. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सार्वजनिक सेवेत अप्रामाणिक माणसे चालत नाहीत, असे स्पष्ट मत त्यांनी सत्काराला उत्तर देताना नोंदविले.



गडहिंग्लज येथे श्री रवळनाथ व 'झेप'तर्फे डॉ. शिवराम भोजे यांचा संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी सत्कार केला. यावेळी आर. एस. निळपणकर, दत्ता पाटील, प्रदीप अभ्यंकर, महेश मजती, मीना रिगणे आदी उपस्थित होते.

### ...म्हणूनच त्यांना जनसेवेचा विसर!

ब्रिटिश काळापासून चालत आलेल्या प्रशासकीय सेवाशर्तीत सरकारी अधिकारी व नोकरांना सेवेची शाश्वती कायद्याने मिळाली आहे म्हणूनच त्यांना कर्तव्याचा, जबाबदारीचा आणि जनसेवेचा विसर पडला आहे. त्यामुळे सरकारी सेवेतील 'शाश्वती' हा शब्द काढून टाकल्याशिवाय ते सरळ होणार नाहीत, असेही भोजे यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी 'झेप'तर्फे घेण्यात आलेल्या सामान्यज्ञान स्पर्धेतील सौरभ आरबोळे, मारुती जोंधळे, सर्जेराव कांबळे, सोहेल पठाण, सनयन फडके, संजीवनी दिवटे, नामदेव कांबळे यांच भोजे यांच्याहस्ते सत्कार झाला.

यावेळी प्राचार्य डॉ. आर. एस निळपणकर, प्रदीप अभ्यंकर, चंद्रकां पत्की, डॉ. संजय चौगुले, डॉ. सुभा पाटील, खजिनदार महेश मजत बसवराज रिगणे, विजय आरबोळे बसाप्पा आरबोळे, शंकरराव पोतदा निजगुणी स्वामी, गीता चिंचणीक रेखा पोतदार, महादेवी आरबोळे अलका आरबोळे, संपदा चौगुले सागर माने, मीना रिगणे, बाबासाहे मार्तंड, आदी उपस्थित होते.